


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ७२७ . वा | बुधवार दि. ०३ एप्रिल २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# आता जोरदार चर्चा फक्त विजयराज शिंदे यांचा अर्ज कायम राहणार का?

## प्रतापरावांचा अर्ज दाखल करतांना भाजपच्या नेत्यांची मोठी उपस्थिती...


## कार्यकर्त्यांच्या भावनांचे आता काय होणार?

**जनसंचलन/बुलढाणा**

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी मंगळवार दि. २ एप्रिल रोजी विद्यमान खासदार प्रतापराव जाधव यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांच्या अर्ज दाखल करतेवेळी शिवसेना (शिंदे गट), भारतीय जनता पक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे नेते व कार्यकर्ते उपस्थित होते. एकीकडे हे सगळे काही होत असताना दुसरीकडे चर्चा या गोष्टीची आहे की, भाजपचे लोकसभा मतदारसंघ प्रमुख विजयराज शिंदे यांचा उमेदवारी अर्ज मागे घेतला जाणार की तो अर्ज कायम राहणार. कारण यावर आगामी निवडणुकीची गणित मोठ्या प्रमाणावर अवलंबून असणार आहे. शिवसेनेत असताना खासदार प्रतापराव जाधव हे खासदार तर विजयराज शिंदे हे आमदार अनेक वर्षे होते. दोघेही एकमेकांना चांगले ओळखून आहेत. परंतु काळाच्या ओघात दोघांमध्ये मतभेद निर्माण झाले व या पुढे-पुढे मतभेदांची ही दरी आणखीन रुंदावत गेली. २०१९ च्या निवडणुकीत प्रतापराव यांनी आपल्या संपर्कप्रमुख पदाचा वापर करून विजयराज शिंदे यांचा पत्ता कट केला आणि आमदारकीसाठी संजय गायकवाड यांच्या गळ्यात उमेदवारीची माळ टाकली. त्या नंतर विजयराज शिंदे यांनी शिवसेनेला जय महाराष्ट्र करीत वंचित बहुजन आघाडीकडून ती निवडणूक लढवली होती. त्या वेळी विजयराज शिंदे यांनी जोरदार संघर्ष करीत भरघोस मते घेतली होती.परंतु या निवडणुकीत संजय गायकवाड विजयी झाले. संजय गायकवाड व विजयराज शिंदे यांच्यात तर विळ्या-भोपळ्याचे सख्य असल्याचे बोलले जाते. कालांतराने पुढे शिवसेनेत फूट पडली परंतु तत्पूर्वीच विजयराज शिंदे यांच्या विमानाने शिवसेनेतून उड्डाण केले होते आणि त्यांचे विमान भारतीय जनता पक्षाच्या धावपट्टीवर उतरले होते. भाजपमध्ये आल्यानंतर विजयराज यांना चांगली वागणूक दिली गेली व त्यांच्यावर मोठी जबाबदारीही टाकण्यात आली. विजयराज य़ांनी या दिलेल्या जबाबदारीच्या संधीचे सोने केले व त्यांनी जिल्हाभर आपले चांगले नेटवर्क तयार केले, तसेच भाजपचे संगठनही मजबूत केले. भाजप कार्यकर्त्यांची ही तीव्र मागणी होती की, या वेळी बुलढाण्याची जागा ही भाजपलाच मिळावी. कार्यकर्त्यांच्या या भावनांचा आदर केला जाईल, असे आश्वासन राज्याच्या नेतृत्वानेही दिले होते. परंतु झाले वेगळेच. पक्षनेतृत्वाने कार्यकर्त्यांच्या भावना समजून न घेता पुन्हा उमेदवारीची माळ ही प्रतापराव जाधव यांच्या गळ्यात टाकली. त्यामुळे अनेक कार्यकर्त्यांचा संताप झाला. परिणामी, विजयराज शिंदे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांच्या उमेदवारी अर्जामुळे महायुतीत एकच खळबळ उडाली. विजयराज शिंदे यांनी अर्ज दाखल केल्यानंतर सांगितले की, मी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर करतो त्यांच्यामुळेच माझी ओळख आहे. त्यामुळेच मी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. एकीकडे कार्यकर्ते हे प्रतापरावांच्या विरोधात ठामपणे उभे असले, तरी दुसरीकडे काही पदाधिकारी व लोकप्रतिनिधी मात्र प्रतापरावांना अनुकूल दिसत आहेत. त्यामुळे सध्या जिल्हा भाजपमध्ये प्रचंड अंतर्गत द्वंद दिसून येत असल्याचे बोलले जात आहे. काही भाजप कार्यकर्त्यांच्या भावना तर एव्हढ्या तीव्र आहेत की ते सांगतात, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आमचे महादेव आहेत, तर प्रता-पराव जाधव हे महादेवाच्या पिंडीवर बसलेला विंचू आहे. हा विंचू ठेचल्याशिवाय पर्यायच नाही. या वाक्यावरून भाजप कार्यकर्त्यांच्या संतापाची कल्पना आपल्याला नक्कीच येऊ शकते. प्रतापरावांचा अर्ज दाखल करते वेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश मांटे, आमदार श्वेताताई महाले, आमदार संजय कुटे, आमदार आकाश फुंडकर, माजी आमदार चैनसुख संचेती या भाजपच्या नेत्यांसह राष्ट्रवादीचे व शिवसेनेचे नेते उपस्थित होते. आता हे सगळे येथे प्रत्यक्ष तर उपस्थित होते. परंतु ही सगळी मंडळी प्रतापरावांचे काम प्रामाणिकपणे निवडणुकीत करतील, याची १०० टक्के शाश्व-ती दिली जाऊ शकत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे प्रतापरावांचे एककल्ली राजकारण. प्रतापराव यांच्याकडे खासदारकी असली की ते साडेचार-पावणेपाच वर्षे भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते व



लोकप्रतिनिधींना यांना साधे विचारत देखील नाहीत. दुसरीकडे विकासाच्या नावानेही शंख. या स्थितीत भाजप कार्यकर्त्यांनी का म्हणून प्रतापरवांचे प्रमाणिक काम करावे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळेच की काय विजयराज शिंदे यांनी जेंव्हा उमेदवारी अर्ज दाखल केला, त्या वेळी मोठ्या संख्येने भाजपचे कार्यकर्ते त्यांच्यासोबत होते. खरे तर यंदाची निवडणूक ही प्रतापरावांना तशीच जड जाणार, हे सांगण्यासाठी कोण्याही राजकीय भाष्यकाराची गरज नाही. कारण प्रतापरावांविषयी जनतेत मोठा रोष आहे. अशा स्थितीत विजयराज शिंदे यांनी उमेदवारी अर्ज कायम ठेवला, तर प्रतपरावांच्या विजयाच्या शक्यता आणखीनच कमी होतील. अशीच स्थिती २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत देखील होती. त्या वेळी तिकीट न मिळाल्याने योगेंद्र गोडे यांनी भाजपशी बंडखोरी करीत निवडणूक लढवली होती. त्यांच्यावर पक्षाने काही काळासाठी कारवाई केली, परंतु नंतर ती कारवाई मागेदेखील घेतली होती. तशाच प्रकारे जर विजयराज शिंदे यांनी उमेदवारी अर्ज कायम ठेवला, तर पक्ष त्यांच्यावर तात्पुरती कारवाई करून नंतर त्यांना पक्षात पुन्हा घेतलेही जाऊ शकते. त्यामुळे विजयराज शिंदे हे आपला अर्ज कायम ठेवूदेखील शकतात. परंतु त्या स्थितीत प्रतापरावांच्या मविजयाफच्या मार्गात एक मोठा मविजयफचा अडथळा येऊ शकतो. आज भाजपचे बरेच लोकप्रतिनिधी व पदाधिकारी प्रतापरावांसोबत दिसत असले, तरी ते शरीराने किती सोबत आणि मनाने किती दूर याचा अंदाजही येत्या काळात येणार आहे. आज भलेही आमदार संजय कुटे व आमदार संजय गायकवाड एकसाथ दिसत असले, तरी त्यांच्यातील कटुतेचा इतिहास जनता अद्याप विसरलेली नसणार. एकमेकांवर अत्यंत खालच्या भाषेत टीका करून एकमेकांची राजकीय इभ्रत वे-शीवर टांगणारे दोन लोकप्रतिनिधी सोबत पाहून जनतेला काय वाटले असेल, ते जनतेलाच ठाऊक. काहीही असले तरी मतदारसंघातील जनतेला आता बदल अपेक्षित आहे. तो बदल कोणत्या स्वरूपात राहील, ही बाब ४ जून रोजी निकाल घोषित झाल्यानंतरच कळेल. कारण त्यानंतरच हे स्पष्ट हो ईल की, मित्रपक्षांच्या लोकप्रतिनिधी व कार्यकर्त्यांनी सोबत काम करण्याच्या घेतलेल्या आणाभाका खऱ्या होत्या की, एकमेकांमधील खुन्नस खरी होती. तुर्तास चर्चांचा बाजार हा मतदानापर्यंत तरी फार गरम राहणार, यात शंका नाही.



# २ एप्रिल रोजी लोकसभा निवडणुकीसाठी सहा उमेदवारांनी केले अर्ज दाखल...

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलडाणा लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी आज ६ उमेदवारांनी नामांकन अर्ज दाखल केले. उमेदवारांनी त्यांचे नामांकन अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्याकडे सादर केले. दरम्यान दि. ४ एप्रिल ही नामांकन अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत आहे. आज बुलडाणा लोकसभा निवडणुकीसाठी ४ जणांनी ६ अर्जाची उचल केली. दरम्यान आज सहा उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहे. आतापर्यंत ५३ जणांनी १२४ अर्जाची उचली केली आहे. तर ८ उमेदवारांनी १४ नामांकन अर्ज दाखल केले आहेत. आज प्रतापराव गणपतराव जाधव शिवसेना, रेखा कैलास पोफळकर अपक्ष, प्रताप पंढरीनाथ पाटील - बहुजन मुक्ती पक्ष, रविकांत चंद्रदास तुपकर - अपक्ष, असलम शहा हसन शहा - महाराष्ट्र विकास आघाडी, मोहंमद हसन इनामदार - मायनॉरिटी डेमोक्रॅटिक पार्टी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. लोकसभा निवडणुकीची अधिसूचना दि. २८ मार्च रोजी प्रसिद्ध झाली आहे. इच्छुकांना दि. ४ एप्रिलपर्यंत सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी नामांकन अर्ज सादर करता येणार आहे. दाखल करण्यात आलेल्या नामनिर्देशन पत्रांची दि. ५ एप्रिल रोजी छाननी करण्यात येणार आहे. तसेच दि. ८ एप्रिल रोजी उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे. दि. २६ एप्रिल रोजी मतदान होणार असून दि. ४ जून रोजी मतमोजणी होणार आहे. लोकसभा निवडणुकीसाठी नामांकन अर्ज दाखल करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज आहे. उमेदवारांना कोरे नामांकन पत्र देणे, अनामत रक्कम भरणे तसेच अर्ज दाखल करण्यापूर्वी छाननीची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच उमेदवारांना ऑनलाईन नामांकन अर्ज दाखल करता येणार आहे. नामांकन अर्ज दाखल करण्यासाठी दि. ४ एप्रिलपर्यंत वेळ असला तरी वेळेवर धावपळ टाळण्यासाठी इच्छुकांनी वेळेच्या आत अर्ज दाखल करावेत, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# रविकांत तुपकरांचा राजकीय एल्गार रेकॉर्ड ब्रेक गर्दीच्या साक्षीने दाखल केला अर्ज...

**जनसंचलन/बुलढाणा**



जाहीर सभेतील आक्रमक अन् भावनिक भाषणे, हलगी, बैलबंडीसह स्वखर्चाने घरची चटणी-भाकर खा-वून बुलडाण्यात हजारोंच्या संख्येत दाखल झालेली जनता या रेकॉर्डब्रेक जनतेच्या साक्षीने रविकांत तुपकर यांनी आज २ एप्रिल २०२४ रोजी बुलडाणा लोकसभेसाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांचे नामांकन म्हणजे स्वबळावर केलेले शक्तिप्रदर्शन ठरले! रविकांत तुपकरांनी २२ वर्षांच्या काळात पहिल्यांदाच राजकीय एल्गार पुकारलाय. स्थानिय जिजामाता व्यापार संकुल नजीकच्या मैदानात तुपकरांची जा-हीर सभा पार पडली. यावेळी तुपकरांनी धुवांधार भाषण करीत उपस्थित कार्यकर्त्यांत जोश भरला. आपल्या भाषणातून त्यांनी केवळ आणि केवळ खासदार जाधव यांनाच लक्ष्य करीत बुलडाणा मतदारसंघातील लढत महायुतीविरुद्ध असल्याचे अप्रत्यक्षपणे सूचित केले. यानंतर संगम चौक, जयस्तंभ चौक, बाजारपेठ, कारंजा चौक मार्गे रॅली काढण्यात आली. यानंतर तुपकरांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे आपला अर्ज दाखल केला. आजच्या गर्दीने तुपकरांचा खासदारकीचा मार्ग मोकळा झाला अशा प्रतिक्रिया सामान्य जनतेतून येत आहे. तर २२ वर्षे जनतेसाठी अविरत झटलो आज तुमच्या आशिर्वादाची गरज आहे, असे आवाहन तुपकरांनी केले. आजच्या निर्धार सभेत रविकांत तुपकरांची दोन रूपे पाहायला मिळाली. हजारोंच्या संख्येने उपस्थित शेतकरी, युवक, माता भगिनी यांच्या बद्दल बोलतांना ते अतिशय भावनिक भाषेत बोलले. मात्र खासदार जाधव यांच्यावर बोलताना ते रोखठोक, आक्रमक बोलले. या दोन्ही भाषे-तील मनोगताला उपस्थितानी भरभरून टाळ्या देत दाद दिली. भाषणाची सुरुवात करतांना तुपकर म्हणाले की, मी तुमच्यासमोर नतमस्तक होतो तुमचं दर्शन घेतो. या रेकॉर्डब्रेक गर्दीने मला लढायला बळ दिले आहे. मला जिल्ह्यातल्या व महाराष्ट्रातल्या नेत्यांना सांगायचं की, ही भाड्याने आणलेली माणसे नाहीत, ही स्वतःच्या खर्चाने पदरमोड करून इथे सभेला आली आहे. २२ वर्षांच्या संघर्षात, तुमचे उपकार जी-वात जीव असेपर्यंत विसरू शकणार नाही.अर्ज भरायला येऊ नये म्हणून विरोधकांनी दबाव टाकला, पण जनता दबावाला भिक घालत नाही. आजही तुम्ही त्यांच्या दबावाला भीक घातली नाही, माझी ताकत, इस्टेट, बळ, सर्वस्व तुम्ही आहात. एक ना एक दिवस राक्षसी प्रवृत्तीचा उन्माद संपणार आहे, असे सांगून त्यांनी जाधवांचा परखड भाषेत समाचार घेतला. मागील १५ वर्षात त्यांनी काय विकास केला याचे उत्तर त्यांच्याकडेही नाही, जिल्हा भकास करून टाकला, हीच त्यांची उप-लब्धी आहे. मेहकर वाल्यांनी अफवा पसरवल्या की, मी अर्ज माघार घेणार म्हणून. मेहकर मध्ये त्यानी अफवांचे पोते भरून ठेवले आहे, मेहकरवाले मुद्दाम करतात. त्यांना यावेळी जनता, शेतकरी पराभवाची धूळ चारणार ही काळ्या दगडावरची रेष आहे असे तुपकर म्हणाले.

# भादोला ते वरवंड नाका रस्ता ठरतोय अपघाताला कारणीभूत...



**जनसंचलन/बुलडाणा**

बुलढाणा तालुक्यातील खामगाव च्या दिशेने जाणारा प्रमुख रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून बांधकाम विभागाच्या दुर्लक्षितपणामुळे मार्गक्रमण करणाऱ्या नागरिकांचा जीव टांगणीला ला-गला आहे. कुठे खड्डे चुकविताना तर कुठे खड्ड्यांमधून रस्ते शोधताना नागरिकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. या खड्डेमय रस्त्यांवरून जीव धोक्यात घालून वाहने चाल-वावी लागत असल्याने कमालीचा संताप व्यक्त केल्या जात आहे. खड्डे चुकविताना संतुलन बिघडल्याने कित्येक दुचाकीस्वार पडून जखमी झाले आहेत रस्त्यांवर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. कित्येक दिवसांपासून रस्त्यांवरील खड्डे उघड्या डोळ्याने दिसत असतांनाही संबंधित विभाग खड्डे बुजविण्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. भादोला ते वरवंड नाक्यापर्यंत मुख्य मार्गांवर ठिकठिकाणी खड्डे पडले असून काही रस्त्यांना तर पांदण रस्त्याचे स्वरूप आले आहे.रस्त्यांचे दुरुस्तीकरणाचे काम हाती घेतले असले तरी अत्यंत संथ गतीने काम सुरु असल्याने रस्त्यांचे काम पूर्ण होण्यास काळ लोटतो की काय, ठेकेदाराने रस्त्याचे काम चालू केले होते परंतु अर्धवट काम सोडून ठेकेदार पसार झाल्याचं दिसतंय पण सार्वजनिक बांधकाम विभाग त्या ठेकेदारावर कोणत्याही प्रकारची कारवाई का करत नसेल यामध्ये ठेकेदाराची व सार्वजनिक बांधकाम विभागाचे काही साठे लोटे तर नाही ना असं नागरिकांमध्ये बोलल्या जात आहे.आतापर्यंत या रस्त्यावर कित्येक झनाचा मृत्यू झालेले आहेत त्यातच दोन दिवसांपूर्वी सुद्धा रस्त्याच्या एका साईडनेच सर्व गाड्या चालत असल्यामुळे टू व्हीलरचा अपघ-ातात झाला सार्वजनिक बांधकाम विभाग अजून मृत्यू होण्याची वाट बघत आहे का असं सुद्धा नागरिकांमध्ये बोलल्या जात आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# समृद्धी महामार्गाच्या अवैधपणे ताब्यातील शिल्लक जमिनीचा मोबदला देण्यात यावा...

## शेतकरी सदानंद वाघमारे यांची उपविभागीय महसूल अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी यांचेकडे मागणी

जनसंचलन/ सिंदखेडराजा

नागपूर मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेस वे लिमिटेड या महामार्गासाठीची मौजे राहेरी खुर्द गट नंबर १४५ मध्ये झालेल्या भूसंपादन संयुक्त मोजणी मध्ये माझ्यावर अन्याय झाला असून माझी ० हेक्टर ५४ आर ४८ चौ.मी. जमीन ही नागपूर मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेस लिमिटेड यांच्याकडे असून यांच्याकडे अवैधपणे असून याबाबत वारंवार पाठपुरावा केला असून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या अनधिकृत पणे ताब्यात असलेल्या ० हे.२५ आर.०९ चौ.मी. माझ्या मालकीच्या जमिनीचा निवाडा माझे नावाने तात्काळ करून मला सदर जमिनीचा मोबदला देण्यात यावा, अशी मागणी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी सिंदखेडराजा यांच्याकडे सदानंद अर्जुनराव वाघमारे यांनी केली आहे.

याबाबत सविस्तर असे की नागपूर मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेस वे लिमिटेड /महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांची सातबारा प्रमाणे २ हे ६९आर ९१ चौ. मी. क्षेत्र असताना प्रत्यक्ष ताब्यात /वहीवाटीप्रमाणे ० हे. २५आर. ०९ चौ.मी.जमीन शिल्लक असल्याचे दिसून येत आहे .

यापूर्वी झालेल्या समृद्धी महामार्गाच्या संयुक्त भूसंपादन मोजणी मध्ये राहेरी खुर्द गट. . क्र. १४५ लगतचे खातेदारक मौजे हिवरखेड पूर्णा गट. क्र.१८२,१८१,१८० तात्कालीन मोजणी कर्मचारी श्री पी एम राजपूत ,श्री सोळंके , निमतानादार भूमी अभिलेख सिंदखेडराजा, श्री एकलारे साहेब उपाधीक्षक भूमी अभिलेख सिंदखेडराजा यांनी संयुक्त मोजणी वेळी हेतू पुरस्कार केलेल्या मानवी चुकांमुळे मौजे हिवरखेड पूर्णा गट नंबर १८२ ,१८१ ,१८० च्या हद्दी हेतू पुरस्कार मौजे राहेरी खुर्द गट.नं. १४५ मधील माझ्या सातबारा प्रमाणे मालकीच्या / ताब्यात /वहीवाटीमध्ये दाखवून मला संपादित क्षेत्र ० हे. २५ आर. ०९ चौ.मी. च्या मोबदल्यापासून



गेल्या ५ वर्षापासून वंचित ठेवून माझ्यावर अन्याय केला आहे.

तरी भूसंपादन अधिकारी तथा सक्षम प्राधिकारी समृद्धी महामार्ग सिंदखेडराजा यांनी अनधिकृतपणे ताब्यात असलेल्या ० हे. २५ आर. ०९ चौ. मी. माझ्या मालकीच्या जमिनीचा निवाडा करून मला या जमिनीचा तात्काळ मोबदला देण्यात यावा अशी मागणी सदानंद अर्जुनराव वाघमारे यांनी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी सिंदखेडराजा यांचेकडे केली आहे.

# कव्हळा येथील साई समाधान आढाव यांचे यश...

जनसंचलन/ चिखली



चिखली तालुक्यातील कव्हळा येथील साई समाधान आढाव याने नवोदय वर्ग सहावीच्या प्रवेश परीक्षा संदर्भात हिवरा आश्रम येथील शिक्षकांचे योग्य वेळी मार्गदर्शन लाभल्याने साईने आपल्या चिकाटी व मेहनतीच्या भरोशावर नवोदय प्रवेश परीक्षेत पात्र ठरल्याने कव्हळा गावातून साईने नवोदय प्रवेश पत्रिकेचा सुरुवात केली आहे शैक्षणिक स्पर्धेच्या युगामध्ये पालक वर्ग आपल्या विद्यार्थ्यांना वर्ग सहावी मध्ये प्रवेश मिळण्यासाठी अतोनात मेहनत घेत असतात शैक्षणिक सत्र २०२३ ते२०२४ मध्ये पार पडलेल्या जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश पात्रता परीक्षेसाठी वर्ग पाचवी मधील विद्यार्थी मोठ्या संख्येने प्रयत्न करीत होते कव्हळा येथील वर्ग पाच चा साई समाधान आढाव यांनी आपल्या आजी आजोबा आई वडील काका काकूचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अफाट परिश्रम जिद्द आणि चिकाटीच्या बळावर नवोदय प्रवेश पात्र परीक्षेत झाल्याने त्यांचे व त्यांच्या परिवाराचे सर्व स्तरातून कौतुक केल्या जात आहे वर्ग सहा पासून पुढील दर्जेदार शिक्षण संपूर्ण व्यवस्थित मोफत मिळणार आहे यावेळी कव्हळा येथील जिल्हा परिषद शाळेने साई यांचा सत्कार केला व हिवरा आश्रम येथील ठाकरे कोचिंग क्लासेसच्या सर्व शिक्षकांना त्यांच्या कुटुंबीयांचा सत्कार करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या मुलांच्या नंतर मुलांच्या यशस्वी अस्तित्वाने मित्रमंडळींच्या नातेवाईक यांच्या शुभेच्छा वर्षावा ने वडील व काकांचे हृदय भरून आलेयाने नवोदय वर्ग सहावीच्या प्रवेश परीक्षा संदर्भात हिवरा आश्रम येथील शिक्षकांचे योग्य वेळी मार्गदर्शन लाभल्याने साईने आपल्या चिकाटी व मेहनतीच्या भरोशावर नवोदय प्रवेश परीक्षेत पात्र ठरल्याने कव्हळा गावातून साईने नवोदय प्रवेश पत्रिकेचा दीप लावला शैक्षणिक स्पर्धेच्या युगामध्ये पालक वर्ग आपल्या विद्यार्थ्यांना वर्ग सहावी मध्ये प्रवेश मिळण्यासाठी अतोनात मेहनत घेत असतात शैक्षणिक सत्र २०२३ २४ मध्ये पार पडलेल्या जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश पात्रता परीक्षेसाठी वर्ग पाचवी मधील विद्यार्थी मोठ्या संख्येने प्रयत्न करीत होते कव्हला येथील वर्ग पाचचा साई समाधान आढाव यांनी आपल्या आजी आजोबा आई वडील काका काकूचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी बाल्य नटखट पणाला तिलांजी ठेवून अफाट परिश्रम जिद्द आणि चिकाटीच्या बळावर नवोदय प्रवेश पात्र परीक्षेत झाल्याने त्यांचे व त्यांच्या परिवाराचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे मुलांच्या यशस्वी अस्तित्वाने मित्रमंडळींच्या नातेवाईक यांच्या शुभेच्छा वर्षावा ने वडील व काकांचे हृदय भरून आले आहे

# नांदुरा अर्बन अपहार प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे क्रिकेट बुकींच्या पोलिस कोठडीत २ दिवसांची वाढ...

जनसंचलन/ नांदुरा

नांदुरा अर्बन बँकेच्या कनिष्ठ संगणक अधिकाऱ्याने आपल्या ईतर कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने ऑनलाईन पद्धतीने केलेल्या ६ कोटी ४५ लाख रुपयांच्या अपहार प्रकरणाचा तपास जिल्हा पोलिस अधीक्षक सुनील कडासने यांनी नांदुरा पोलीसांकडून आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपविला आहे. त्यामुळे आर्थिक गुन्हे शाखेने तपासाला सुरुवात करुन आज नांदुरा पोलीसांच्या कोठडीत असलेल्या बँकेचा कनिष्ठ संगणक अधिकारी प्रतिक शर्मा व क्रिकेट बुकी जुबेर खान सफदर खान आणि शेख सादीक शेख मोईन या तीघा आरोपींना आपल्या ताब्यात घेतले आहे. अटकेत असलेल्या तीघा आरोपींपैकी क्रिकेट बुकी जुबेर खान सफदर खान व शेख सादीक शेख मोईन या दोघांची पोलिस कोठडी आज संपल्याने या दोघांना आर्थिक गुन्हे शाखेने नांदुरा न्यायालयात हजर करून त्यांची पुन्हा दोन दिवसांची पोलीस



कोठडी घेतली आहे. तर प्रतिक शर्मा याची पोलिस कोठडी मंगळवारी संपणार असल्याने त्याला न्यायालयात हजर करून आर्थिक गुन्हे शाखेचे अधिकारी प्रतिक शर्मा याच्या पन्हा माहिती आर्थिक गुन्हे शाखेने दिली आहे. आर्थिक गुन्हे शाखेकडे तपास गेल्याने आता तपासाला गती मिळणार असून अपहार प्रकरणात सहभागी असलेल्या सर्वांचे टेंशन यामुळे वाढले आहे. ज्यांच्या ज्यांच्या खात्यात व्यवहार करण्यात आले त्या सर्वांची आर्थिक गुन्हे शाखा चौकशी करणार असल्याने या प्रकरणात आता मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. तसेच अटकेच्या भितीपोटी अनेक जण भूमिगत झाल्याचीही माहिती प्राप्त झाली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास जिल्हा पोलिस अधीक्षक सुनील कडासने, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात व डीवाय एसपी गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक एकनाथ पाडळे, पीएसआय गजानन मोरे, हे. कॉ. केदार फाळके, शेळके, हरणे, व चालक शरद होईफोडे हे करीत आहेत .

# महात्मा फुले जयंतीनिमित्त मलकापुरात नियोजन बैठक

जनसंचलन/मलकापूर



बहुजन उद्धारक सेवा समितीच्या माध्यमातून येत्या ११ एप्रिल २०२४ रोजी महात्मा जोतीराव फुले जयंतीनिमित्त येथील शहीद संजयसिंह राजपूत स्मारक परिसर मैदानावर हभप शिवलीला पाटील यांचे समाजप्रबोधनपर कीर्तन सायंकाळी ७ वाजता आयोजित केले आहे. त्याअनुषंगाने नियोजन बैठक पार पडली. यावेळी नियोजन बैठकीमध्ये महात्मा जोतीराव फुले जयंतीनिमित्त आयोजित विविध कार्यक्रमांबाबत नियोजन करण्यात आले. कीर्तनाच्या कार्यक्रमात महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सामाजिक कार्य पुरस्कार, विशेष कर्तव्य पुरस्कार तसेच सत्यशोधक फुले दाम्पत्य सामाजिक कार्य पुरस्कार वितरण होणार आहे. यावेळी संतोष बोंबटकार, अशोक वानखेडे, किशोर राऊत, प्रा. डॉ. नितीन भुजवळ, प्रल्हाद उमाळे, मंगेश सातव, सुपेश बोंबटकार, दीपक बावस्कार, सोनोने सर यासह बहुजन उद्धारक सेवा समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थितीत होते.

# शरद पवार यांचा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर हल्लाबोल माझ्यामुळे विरोधी पक्षात बसावे लागले...

**वृत्तसंस्था/ नागपूर**

महाराष्ट्रासह देशात परिवर्तनाचे वारे वाहत आहेत. देशात मोदीविरोधी वातावरण आहे. भाजपच्या कारभारावर सर्वच मतदार नाराज आहेत. विविध वर्तुळात मोदीविरोधी कल दिसून येत आहे. यामुळे भाजपचे नुकसान होईल, असा दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केला आहे. पंतप्रधान मोदींची विचारधारा देशाच्या हिताची नाही. नरेंद्र मोदी यांचा विरोधात भूमिका घेणाऱ्यांना तुरुंगात टाकले जात आहे. अरविंद केजरीवाल आणि हेमंत सोरेन यांना केलेली अटक हे संविधानावरील हल्ला आहे. राजस्थानच्या मुख्यमंत्र्यांना धमकावले होते. पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री आणि इतर राज्यातील मुख्यमंत्री, त्यांना तुरुंगात टाकण्याचे काम हे सरकार करत आहे. देशात अघोषित आणीबाणीची स्थिती आहे. केजरीवाल आणि सोरेन यांची अटक म्हणजे लोकशाहीवर हल्ला आहे.भाजपने अजित पवारांनाच आपल्या गोटात घेतलेच नाही तर शरद पवार यांच्याकडून राष्ट्रवादी काँग्रेसचे निवडणूक चिन्ह हिसकावून घेतले. या गोष्टींमुळे महाराष्ट्राच्या राजकारणातील शरद पवार यांचा कार्यकाळ संपला आहे, असे बोलले जात होते. याबाबत शरद पवार यांना विचारले असता ते म्हणाले, महाराष्ट्रातील एक नेता आहे. ते आता सरकारमध्ये उपमुख्यमंत्री आहे. पाच वर्षांपूर्वी ते प्रत्येक सभेत म्हणायचे की, शरद पवार संपले. मात्र निवडणुकीच्या निकालानंतर परिस्थिती अशी बनली की, पुढची अडीच वर्षे शरद पवारांच्या सहकाऱ्यांनी सरकार चालवले आणि त्या नेत्याला विरोधी पक्षात बसावे लागले.बारामती लोकसभा मतदारसंघाबाबत विचारण्यात आले असता शरद पवार म्हणाले की, निवडणुकीची प्रोसेस सुरू झाली नाही, इलेक्शन सुरू झालेली नाही, मतदान व्हायचे आहे. येथील लोकांचा कल मतदानानंतरच कळेल.



याआधी सुप्रिया सुळे बारामतीतून विजयी झाल्या होत्या. यापुढेही सुप्रिय सुळेच जिंकतील, असा विश्वास शरद पवार यांनी व्यक्त केला.

# वडिलांचा अपघाती तर मुलाचा उपचारादरम्यान मृत्यू...

**जनसंचलन/चिखली**

चिखली तालुक्यातील उदयनगर येथे एका कुटुंबावर २ एप्रिल रोजी अचानक दुःखाचा डोंगर कोसळला. रुग्णालयात उपचार घेत असलेल्या एका युवकाचा मंगळवारी सकाळी मृत्यू झाला तर त्याच्या पाठोपाठ त्याच्या वडिलांच्याही दुचाकीला अपघात होऊन मृत्यू झाला. संतोष काकडे यांच्या २० वर्षाच्या संदीप नामक मुलावर जळगाव खान्देश येथे गेल्या काही दिवसापासून उपचार सुरू होते. दरम्यान २ एप्रिल रोजी सकाळी आठ वाजेच्या सुमारास संदीपचा रुग्णालयात उपचारादरम्यन मृत्यू झाल्याची घटना समोर आली. दरम्यान, ही घटना घडल्यानंतर अवघ्या एक ते दीड तासात मृत संदीपचे वडील संतोष रामकृष्ण काकडे यांचाही दुचाकी अपघातामध्ये मृत्यू झाला. २ एप्रिल रोजी सकाळी नऊ वाजेच्या सुमारास संतोष रामकृष्ण काकडे (४५) हे दुचाकीवर (एमएच २८-बीएस-३१४१) किन्ही सवडत गावाकडे जात होते. त्यावेळी त्यांची दुचाकी एका झाडाला धडकली व त्यांचा जागीच मृत्यू झाला. सकाळी नऊ वाजेच्या सुमारास ही घटना घडली. दरम्यान किन्ही सवडत येथील पोलिस पाटील धंदरे यांनी या प्रकरणी अमडापूर पोलिसांना माहिती दिली.अपघातग्रस्त दुचाकी. जळगाव खान्देशमधील रुग्णालयात उपचारादरम्यान सकाळी आठ वाजेच्या सुमारास मृत्यू पावला होता. कदाचीत त्याचे वृत्त कळाल्याने धक्का बसून संतोष काकडे यांचे वाहनावरील नियंत्रण सुटून त्यांचा अपघात




झाला असावा असा कयास व्यक्त होत आहे. परंतू या दुर्देवी घटनेमुळे उदयनगरमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. संतोष काकडे यांच्या अपघाती मृत्यूप्रकरणी अमडापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. पुढील तपास पोलिस करत आहेत. दरम्यान या मार्गाने अपघाताच्या घटना वाढल्याचे दिसून येत आहे.त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी पोहोचत संतोष काकडे यांचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविला

# अडत व्यावसायिकास दोघांनी केली मारहाण

**जनसंचलन/ खामगाव**

दुचाकीने घरी निघालेल्या अडत व्यावसायिकास दोघांनी मारहाण करुन जखमी केल्याची घटना तायडे कॉलनीतील फादरच्या बंगल्यासमोर घडली. याबाबत अडत व्यावसायिक सुनिल मधुकर राऊत वय ३९ रा. साईनगर वाडी यांनी शहर पोस्टेला तक्रार दिली की, ते शनिवारी दुचाकीने घरी जात होते. दरम्यान तायडे कॉलनी भागात फादरच्या बंगल्यानजीक मंगेश रामदास इंगळे वय ३८ रा. घाटपुरीनाका व त्यांचा काका यांनी मागून येवून आवाज दिला व लोखंडी रॉड मारुन खाली पाडले. यामुळे दुचाकी स्लीप होवून पडली. त्यामुळे राऊत हे जखमी झाले. यावेळी त्या दोघांनी मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी दिली. या तक्रारीवरुन पोलिसांनी उपरोक्त दोघांविरुध्द कलम ३२४,५०४, ५०६, ३४ भादंवीनुसार गुन्हा दाखल केला आहे.

# विहिरीत पडून शेतकऱ्याचा मृत्यू

**जनसंचलन/ खामगाव**

मोटारीचा सेक्शन पाईप वर काढत असतांना अचानक विहिरीत पडल्याने शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना तालुक्यातील शहापूर येथे घडली. येथील शेतकरी सोनाजी रामराव वाडेकर वय ४२ हे रविवारी त्यांच्या शेतातील विहिरीवरील मोटारीचा सेक्शन पाईप वर काढण्याचा प्रयत्न करीत होते. यावेळी अचानक तोल गेल्याने ते खोल विहिरीत



पडले. यात पाण्यात बुडून त्यांचा मृत्यू झाला. या घटनेने गावात हळहळ व्यक्त होत आहे. याप्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिसांनी मर्ग दाखल केला आहे.

# अधिकाऱ्यांना हाताशी धरुन १२ ते १३ घोटाळे, अनिल परब यांचा रामदास कदम यांच्यावर गंभीर आरोप

**वृत्तसंस्था/ मुंबई**

शिवसेनेचे नेते रामदास कदम यांनी सरकारी अधिकाऱ्यांना हाताशी धरून घोटाळे केले आहेत,फ असा गंभीर आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अनिल परब यांनी मंगळवारी येथे केला.कदम यांनी केलेले १२ ते १३ घोटाळे आपण लवकरच बाहेर काढू, असेही परब यांनी जाहीर केले. परब यांच्या या नव्या आरोपामुळे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि शिवसेना यांच्यात आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडणार आहेत.अनिल परब यांनी पत्रकार परिषदेत रामदास कदम यांच्यावर घोटाळ्याचा आरोप करताना खेडमधील एका भूखंडाला दाखला दिला. कदम यांनी मंत्रिपदाचा गैरफायदा घेतला असून, सरकारी अधिकाऱ्यांच्या सहभागाशिवाय हे घोटाळे होऊच शकत नाही. मी रामदास कदम यांचे १२ ते १३ घोटाळे बाहेर काढणार आहे. यातील दोन प्रकरणांची कागदपत्रे मी किरीट सोमय्या यांना देणार आहे. किरीट सोमय्या हे महाराष्ट्राचे अण्णा हजारे आहेत. त्यांनी रामदास कदम यांच्यासह त्यांच्या मुलांच्या घोटाळ्याची चौकशी करावी,अशी मागणी अनिल परब यांनी केली.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958